# पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनर ग्रामीण जिल्हा पोलीस शिपाई भरती सन 2024-25

## -: बॅण्डस्मन उमेदवारांकरीता महत्वाची सुचना :-

पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हा पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ मध्ये पोलीस शिपाई यांच्या रिक्त असलेल्या ५३ पदापैकी ०४ पदे पोलीस शिपाई बॅण्डस्मन करीता गुणवत्तेनुसार राखीव ठेवण्यात आली आहेत. सदरचे रिक्त असलेली पदे भरण्याकरीता ऑनलाईन अर्ज प्राप्त उमेदवारांची मैदानी चाचणी दि.११/०२/२०२६ ते दि.१८/०२/२०२६ या कालावधीमध्ये गौकुळ मैदान, पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे घेण्यात आलेली आहे.

२. मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.अपोमसं/प्रशि/पो.शि.भरती/पो.भ.२०२४-२५/८४/२०२४/३७७, दि.०२/०३/२०२६ मध्ये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे शारिरीक व मैदानी चाचणीमध्ये किमान ५०% गुण प्राप्त केलेल्या ३७३ बॅण्डस्मन उमेदवारांपैकी गुणवत्तेनुसार **१:१५** उमेदवारांची अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) घेण्याकरीता या कार्यालयात समिती गठीत करण्यात आली आहे. सदरील अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) दि.०७/०३/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वाजेपासुन गौकुळ मैदान, पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे घेण्यात येणार आहे.

| अ.क्र. | कौशल्य चाचणीचा प्रकार | गुण |
|---|---|---|
| १. | वाद्यवादन (Practical Test)<br>जे वाद्य वाजविण्यात पारंगत आहे ते वाद्य वाजविण्याचे कौशल्य प्रात्यक्षिक सादरीकरण. | ५० गुण |
| २. | वाद्यांचे/ पाश्चात, भारतीय संगीताचे ज्ञान | २५ गुण |
| ३. | स्वरांचे ज्ञान, स्वर ओळखणे, स्वर किंवा लय गाता / वाजविता येणे | २५ गुण |
| | एकुण गुण | १०० गुण |

३. मैदानी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या बॅण्डस्मन उमेदवार यांना बॅण्ड पथकातील वाद्याची (क्लॉरनेट, सेक्सोफोन, ट्रम्पेट, इपोनियम, बेस ड्रम व साईट ड्रम ईत्यादी) माहिती असणे व वाद्य वाजविण्याचा अनुभव असणे आवश्यक असुन उमेदवारांनी त्यांचे अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) मध्ये प्रात्यक्षिक सादरीकरण करणेकरीता आपलेकडील वाजविण्याचे वाद्य व माऊसपिस / रिड सोबत आणावे.

४. सदर अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) ही १०० गुणांची असुन त्यापैकी उमेदवारास कमीत कमी ५० गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. सदरहु चाचणी अर्हता चाचणी असल्याने, सदरहु चाचणीत प्राप्त झालेले गुण गुणवत्ता यादी तयार करताना विचारात घेतले जाणार नाहीत.

५. अर्हता चाचणी (कौशल्य चाचणी) मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून रिक्त जागेच्या १:१० या प्रमाणात पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचीच पोलीस बॅण्डस्मन पदाकरीता लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.

**(डॉ. विनयकुमार मे. राठोड)**
पोलीस अधीक्षक,
छत्रपती संभाजीनगर ग्रामीण.